# वसई विरार शहर महानगरपालिका

**मा. स्थायी समिती सभा दिनांक १०/०८/२०१८**

**सभा सुचना क्रं. ०५ दु ३.०० वा.**

| अ क्र. | विषयाचे नाव | स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १. | मागील मा. स्थायी समिती सभा दि.१६/०७/२०१८ रोजींचे इतिवृत्त कायम करणे. | ठराव :- मागील मा. स्थायी समिती सभा दि. १६/०७/२०१८ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री.किशोर ना.पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| २. | टर्न टेबल लॅंडर (T.T.L.) वाहनाच्या स्पेअर पार्ट खरेदीचे देयक अदा करणेबाबत. | ठराव :- टर्न टेबल लॅडर वाहनास दि. ०२/०६/२०१८ रोजीचे आदेशामधील स्पेअर पार्टस पुरविणे कामी ॲनलॉन टेक्नोलॉजी सोल्यूशन प्रा.लि. यांना झालेल्या बिलाची रक्कम रु. १२,७७,२८१/- (अक्षरी रक्कम रु. बारा लाख सत्याहत्तर हजार दोनशे एक्याऐंशी रु) अदा करण्यास ही सभा मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री.नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ३. | वसई विरार शहर महानगरपालिका, विभागीय कार्यालय नवघर-माणिकपूर, प्रभाग समिती 'एच' हद्दीतील तुळजाभवानी उद्यान व्यावसायीक दृष्टीकोणातून व्हिडिओ शुटिंग, चित्रीकरण व फोटोग्राफीसाठी भाडेतत्वावर देऊन त्यांच्या कडून भाडे वसूल करणेस मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रकरणी साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. यात फोटोग्राफीसाठी प्रती तास रु. ४०००/-(अक्षरी रु. चार हजार मात्र) आकारण्यांत यावेत. तसेच तुळजाभवानी उद्यानात व्यावसायिक दृष्टीकोनातुन विडीओ शुटींग, चित्रीकरण याबाबत प्रशासनाने सुधारीत प्रस्ताव सभेच्या पटलावर ठेवावा यास सभेने एकमताने मंजूरी दिली.<br>**अनुमोदक :- मा.श्री. किशोर ना.पाटील सूचक :- मा.श्री.पकंज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ४. | प्रभाग समिती- एफ धानिव/पेल्हार (जुना ब) क्षेत्रातील वॉर्ड क्र.७१ मधील तुलसीनगर येथील श्याम अंकीत डेअरी ते साई द्वारकापुरी चाळ ते नाला व जय वेल्फोअर सोसायटी येथे रस्ता खडीकरण करणे कामी या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करणेस मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयाबाबत सभागृहात साधक-बाधक चर्चा करण्यांत आली. सदर कामी मे. श्री. लक्ष्मी नारायण इन्फ्रास्ट्रक्चर यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ०.००% दराने ही प्राप्त निविदांमध्ये लघुत्तम दराची आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देण्याकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार मा.स्थायी समिती महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये संविदा करणेंस ही सभा मान्यता देत आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास व त्या अनुषंगाने येणाऱ्या इतर अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>ठराव सर्वानुमते मंजूर |

| | | |
|---|---|---|
| ५. | उद्यान विभागासाठी २ नग चेसीजवर टेलीस्कोपीक हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी प्राप्त झालेल्या ई-निविदांपैकी कमी दराच्या निविदाकारासोबत संविदा करणेस मंजूरी मिळणेबाबत. | ठराव :- सदर प्रस्तावाचे सभेमध्ये वाचन करून चर्चा केली असता उद्यान विभागासास दोन ९०९ ह्या पध्दतीच्या चेसीजवर टेलीस्कोपीक हायड्रोलिक लॅडर बसविणेकामी वाटाघाटीअंती वाहनासाठी कमी केलेल्या दरास तसे हमी कालावधी नंतर प्रति वर्षासाठी देखभाल व दुरुस्ती करणेकामासाठी योग्य व कमी दराच्या ई-निविदा सादर केलेले निविदाधारक मे. हायटेक सर्विसेस ह्यांचेसोबत संविदा करणेंस तसेच त्याकामी येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. नितीन राऊत**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ६. | प्रभाग समिती जी कार्यक्षेत्रातील वॉर्ड क्र.१०५ मध्ये जुचंद्र येथे जुचंद्र कार्यालय संरक्षक भिंत बांधणेकामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजूर करुन संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे. सुरेश एंटरप्रायजेस ह्यांची निविदा (-) १३.०४% कमी दराने दर सर्वात कमी व वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस संविदा करणेंस मान्यता देणेकरीता मा.आयुक्त ह्यांनी मा.स्थायी समितीकडे शिफारस केली आहे. मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार संविदा करणेंस तसेच येणाऱ्या अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.सुषमा लोपीस सूचक :- मा.श्री. पंकज पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ७. | श्रीमती हर्षाली वर्तक हिला गिर्यारोहकासाठी वित्तीय साहाय्य मंजुर करणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार प्रस्तावात सादर केल्याप्रमाणे मा.सर्वसाधारण ठराव क्र. ०५ दिनांक १४/०७/२०१७ अन्वये साहसी खेळास प्रोत्साहनपर रोख बक्षिस देऊन गौरविण्यांच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने हर्षाली वर्तक हिला रु. २ लक्ष वित्तसहाय्य देणेकामी ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |
| ८. | दहीहंडी उत्सवात गोविंदा पथकाचा वीमा काढणेसाठी मे. ओरीयंअल इंशुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई यांचे दरपत्रकास मंजूरी देऊन याकामी होणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत. | ठराव :- सदर विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीतील सर्व गोविंदा पथकांचा महानगरपालिकेमार्फत मोफत अपघाती विमा काढण्यासाठी येणाऱ्या ३ लक्ष ५० हजार इतक्या खर्चास ही सभा सर्वानुमते वित्तीय मंजूरी देत आहे. या योजनेचा लाभ घेणेसाठी सदर कामी वृत्तपत्रात जाहीर आवाहन प्रसिध्द करणेंत तसेच मे.ओरियंटल इंशुरंस कंपनी लिमिटेड, मुंबई कंपनीला सर्व गोविंदा पथकांचा विमा उतरविण्यासाठी रु. ३,००,०००/-इतकी रक्कम आगाऊ स्वरुपात व उर्वरीत रक्कम सदरचे काम पुर्ण झाल्यानंतर अदा करण्यास ही सभा सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.दिक्षा घरत सूचक :- मा.श्री. वैभव पाटील**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

| | | |
|---|---|---|
| ९. | वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा वित्त सहाय्य मिळणेकामी प्राप्त अर्जावर विचार विनीमय करुन वित्तीय अनुदान मंजूर करणेबाबत. | ठराव :- वरील प्रस्तावावर सभागृहात सविस्तर चर्चा करण्यांत आली. त्यानुसार मा.सर्वसाधारण ठराव क्र. ०५ दिनांक १४/-७/२०१७ च्या सर्वसाधारण नियमावलीतील अटी व शर्त नुसार वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीत पदक प्राप्त या स्पर्धेमध्ये सहभागी झालेल्या परंतु कोणतेही पदक मिळवू न शकलेल्या स्पर्धकाला प्रोत्साहनपर अनुदान असे प्रस्तावातील वित्त सहाय्य मागणी अर्ज क्र. ०१ ते अर्ज क्र. २७ अशा एकूण २७ खेळाडूंना रोख बक्षिस देवून गौरविण्याच्या योजनेची मंजूर नियमावलीच्या अनुषंगाने वित्त सहाय्य देणेकामी ही सभा मंजूरी देत आहे. व त्याकामी होणाऱ्या खर्चास ही सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील   सूचक :- मा.श्री.पंकज ठाकूर**<br>**ठराव सर्वानुमते मंजूर** |

नगरसचिव

वसई-विरार शहर महानगरपालिका